# एक 'प्रीतम' योगायोग!

एका सायंकाळी अरुण शेवते, 'एबीपी माझा'चा संपादक मित्र राजीव खांडेकर आणि मी यांना सुशीलकुमार शिंदे म्हणाले, ''एका वल्लीशी गप्पा मारायला तुम्हाला घेऊन जातो.'' त्यांच्यामागून दादरला हॉटेल प्रीतमच्या शेजारच्या बोळातून वाट काढत पहिल्या मजल्यावर आम्ही पोहोचलो. दार वाजवलं आणि काही एक परिचय नव्हता, तरी आमचं अगदी दिलेर स्वागत झालं. शिंदेंनी ओळख करून दिली, ''हे कुलवंतसिंग कोहली... 'प्रीतम'चे संस्थापक-मालक.'' नंतर जवळपास चारेक तासांनी ही गप्पांची बैठक नाइलाजाने संपवावी लागली. ती संपताना एक ठराव सर्वसंमतीनं मंजूर झाला.

त्याचं दृश्य स्वरूप म्हणजे हे पुस्तक. इतकं रोचक आयुष्य जगलेल्या कुलवंतसिंग यांचं सदर 'लोकसत्ते'त असायलाच हवं, असं सगळ्यांनाच वाटलं. नंतर जवळपास तीन महिने हाताशी होते ते कसं करता येईल वगैरे ठरवण्यासाठी. या सगळ्याचं शब्दांकन करावं, असं ठरलं. ती जबाबदारी नीतिन आरेकर यांनी नेहमीच्याच उत्साहात पार पडली.

सुरुवातीचा एक महिनाभर... 'हे आम्ही कशाला वाचायचं मुंबईचं सदर?' अशा पुणेरी वाटणाऱ्या प्रतिक्रिया पुण्यासह सगळीकडूनच आल्या. पण नंतर ते सदर इतकं लोकप्रिय झालं की, वर्षभरानंतर संपवताना लोकसत्ता आणि खुद्द कुलवंतसिंग यांनाही ते जड गेलं.

सदर संपण्याची ही रुखरुख 'राजहंस'मुळे काही प्रमाणात दूर होईल. त्यासाठी राजहंस प्रकाशनाचे दिलीपराव माजगावकर आणि अन्य सर्वांचे आभार.

**गिरीश कुबेर**
संपादक, दै. लोकसत्ता




# हा प्रवास सुंदर आहे...

आपण जन्म घेतो आणि आपला जगण्याचा प्रवास सुरू होतो! आपण जेव्हा एखाद्या प्रवासाला निघतो, तेव्हा त्याचं संपूर्ण नियोजन केल्याशिवाय निघत नाही. कोणत्या टप्प्यावर निघायचं, कोणत्या टप्प्यावर विश्राम घ्यायचा, कुठं राहायचं, कोणतं सामान बरोबर घ्यायचं, कोणाकोणाला सोबत घ्यायचं, कोणतं वाहन वापरायचं - सारं काही सुनिश्चित झाल्याखेरीज आपण बाहेर पडत नाही. पण मातेच्या उदरातून बाहेरच्या जगात येताना पहिला 'टँ हँ' झाला की, एक प्रवास सुरू होतो. या प्रवासावर सुरुवातीला आपलं नियंत्रण नसतं. पालक सांगतात तसं आपण जगत जातो, आपण वयात येतो, मिसरूड फुटतं, मग आपला प्रवास आपण करायला लागतो. तारुण्याच्या झोकात आपणच आपले निर्णय घेतो, वाटायला लागतं, आपल्या जीवनप्रवासाचे आपण कर्तेधर्ते. कधी गोष्टी मनाप्रमाणे होतात, कधी गोष्टी मनाप्रमाणे होत नाहीत. पण आपण मस्तीत जगत राहतो. प्रौढत्वाचा टप्पा ओलांडल्यावर मात्र जाणवायला लागतं, की आपण आपल्या मनाप्रमाणं जगत आहोत, ही भावना फोल आहे. हा सारा प्रवास पूर्वनियोजित आहे, हे पूर्वनियोजन आपल्या हाती नाही. खरं तर काहीच आपल्या हाती नाही, सारं काही 'रब' आणि 'वाहे गुरु' ठरवतात. आपण त्यांनी आखून दिलेल्या वाटेवर चालणारे वाटसरू आहोत. मात्र हा जीवनप्रवास सुंदर आहे.

कोण कुठला मी. रावळपिंडीतला माझा जन्म. कालांतराने वडलांच्या मुंबईत येण्यामुळे मी मुंबईत आलो, मी चौदा वर्षांचा असताना आपल्या देशाची दुर्दैवी फाळणी झाली. त्या वेळी पतियाळाच्या महाराजांच्या हाताखाली फाळणीग्रस्त लोकांना मदत करण्याची जी सवय लागली, ती आजतागायत कायम राहिली. वाहे गुरुंनी ती भावना मनात कायम ठेवली, मी त्यांचा ऋणी आहे. या मुंबईनगरीने मला अन् आमच्या संपूर्ण परिवाराला स्वत:त सामील करून घेतलं. आमच्या उपक्रमांना पाठिंबा दिला. आमच्या शीख बांधवांनी मुंबईत बैसाखी सुरू केली, तिला भव्य समारंभाचं स्वरूप मुंबईनं दिलं. शिक्षणसंस्था काढल्या, त्यांना मुंबईनं आपल्या लेकरांसह वाढवलं. कलावंतांनी चित्रपटसृष्टीत काही भर घालण्याचा प्रयत्न केला, मुंबईनं या कलावंतांचं लालनपालन करून त्यांना पोसलं, काही बांधवांनी पंजाबी अन्नपदार्थ आणले, त्यांना मुंबईनं आपल्या चवीत सामील करून घेतलं. काही सामाजिक संस्थांनी रुग्णालयं काढली, त्या रुग्णालयांकडून मुंबईनं आस्थेनं सेवा करवून घेतली. काही क्रीडापटूंनी खेळांत प्रगती साधण्याचा प्रयत्न केला, मुंबईनं त्यांना विश्वाचं मैदान उपलब्ध करून दिलं. काही राजकीय मंडळींनी मुंबईकरांची सेवा करण्याचं स्वप्न पाहिलं, मुंबईनं ते स्वप्न पूर्ण केलं. माझ्यासारख्या एका सामान्य व्यक्तीला मुंबईनं स्वत:चा शेरीफ बनवलं.... अजून काय हवं? सही माने में 'ये है मुंबई मेरी जान!'

७ जानेवारी २०१८ ला लोकसत्तेच्या 'लोकरंग' पुरवणीच्या सहाव्या पृष्ठावरच्या अर्धपानभर छापल्या जाणाऱ्या 'ये है मुंबई मेरी जान' या सदरातून माझी व वाचकांची वर्षभर भेट सुरू झाली व ती ३० डिसेंबर २०१८ पर्यंत सातत्यानं ५२ आठवडे होत राहिली. हे सदर सुरू कसं झालं, याची एक कथाच आहे.

ऑक्टोबर २०१७च्या रात्री नऊच्या सुमारास माझे ज्येष्ठ स्नेही, भारताचे माजी गृहमंत्री व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांचा मला फोन आला, ''कुलवंतजी, कुठे आहात? आम्ही काही स्नेही 'प्रीतम'मध्ये जेवायला येत आहोत.'' मी म्हणालो, ''सुशीलजी, जरूर आईये, लेकिन मैं घरपर आया हूँ.'' सुशीलकुमारजी म्हणाले, ''ठीक है.'' ते अधिक काही बोलायच्या आत गडबडीने मी त्यांना विनंती केली, ''घरी आलो म्हणून काय झालं, तुम्ही घरी जेवायला या.'' सुशीलकुमारजींच्या सुशील स्वभावाप्रमाणे ते म्हणाले, ''घरी नको. भाभीजींना त्रास होईल.'' ''सुशीलजी, तुम्ही आल्याचा त्रास कसला, आपण जेवण 'प्रीतम'मधूनच मागवू. मग तर झालं?'' त्यांनी ते मान्य केलं.

त्या दिवशी संध्याकाळी सुशीलकुमारजींचे स्नेही, कवी आणि संपादक अरुण शेवते यांच्या 'ऋतुरंग' या दिवाळी अंकाच्या रौप्यमहोत्सवी अंकाचं प्रकाशन होतं. त्यात सुशीलकुमारजींच्या पुस्तकाचंही प्रकाशन झालं होतं. काही वेळानं सुशीलकुमारजी त्यांच्या स्नेह्यांसमवेत आले. त्यात 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर, 'ए.बी.

पी. माझा'चे राजीव खांडेकर, डॉ. उदय निरगुडकर, सुदेश हिंगलासपूरकर आणि 'ऋतुरंग'चे अरुण शेवते होते. आमची छानशी मैफल जमली. सारे जण दिग्गज होते. गप्पा रंगल्या. या गप्पांमधून गिरीशजींना कल्पना सुचली की, 'लोकसत्ता'मध्ये माझ्या आठवणींचं एक सदर सुरू करता येईल. माझी तयारी नव्हती, पण ही कल्पना सर्वांना भावली. सर्वांनी मला आग्रह केला. मी तयार झालो, पण माझी अडचणही गिरीशजींना सांगितली, ''मला मराठी चांगलं समजतं, पण चांगलं मराठी बोलता येत नाही. मी हिंदी, पंजाबी आणि इंग्रजीतून बोलेन. ते कोणी तरी मराठीत लिहिलं पाहिजे.'' नंतर मला कळवलं गेलं की, कोणी प्रा. नीतिन आरेकर नावाची व्यक्ती माझे विचार शब्दांकित करणार आहे. काही दिवसांनी गिरीशजी, अरुणजी हे नीतिनजींना घेऊन माझ्याकडे आले आणि ह्या सदराचा प्रारंभ झाला.

नीतिन आरेकर मला पहिल्यांदा भेटत होते, पण आमची गट्टी जमली, वयाचं अंतर पटकन ओलांडलं गेलं. अर्थात नीतिनजी नेहमी भेटल्यावर पहिले पैरीपौना करत असत व मगच आम्ही बोलायला प्रारंभ करत असू. मी त्यांच्याशी पंजाबी, हिंदी, इंग्रजीत बोलत असे आणि ते रेकॉर्ड करून घेत असत. पहिले तीन लेख त्यांनी मला एकत्र ऐकवले व त्यानंतर मी त्यांना कधीही सांगितलं नाही की, 'मला लेख वाचून दाखवा.' मी जे बोलत होतो ते त्यांनी जसंच्या तसं नाही, तर अधिक चांगल्या शैलीत लिहिलं. अनेकदा लोकांना प्रश्न पडायचा की, कुलवंतसिंगांचं मराठी इतकं चांगलं कसं? नीतिनजींच्या दर सोमवारी येण्याची आम्हाला साऱ्यांनाच सवय झाली होती. ते आता माझ्या परिवाराचा हिस्सा बनले आहेत. प्रस्तुत सदरलेखन सुरू असताना मला माझी दोन्ही मुलं अमरदीपसिंग म्हणजे टोनी आणि गुरुबक्षसिंग म्हणजे गोगी यांची खूप मदत झाली. आठवणींचा हिंदोळा कधी हिंदकळला, तर मी या दोघांना विचारत असे.

दर रविवारी 'लोकसत्ते'तल्या 'ये है मुंबई मेरी जान' सदरामुळे मला जगभरात वेगळी ओळख मिळाली. मला भारतातूनच नव्हे तर जगाच्या काना-कोपऱ्यातून ई-मेल येत असत. रविवारनंतरच्या सोमवारी माझ्या सेक्रेटरीला ई-मेलची एक रास माझ्यासमोर ठेवावी लागायची. खरंच सांगतो, बावन्न आठवड्यांनंतर माझ्याकडे आलेल्या ई-मेल्सनी तीन बॉक्स फाईल्स भरल्या होत्या. 'लोकसत्ता'ची जगभरातील वाचकप्रियता मला यात दिसून आली. प्रीतममुळे माझं जग विस्तारलेलं होतं, पण या सदरामुळे संत ज्ञानेश्वर म्हणतात त्याप्रमाणे 'हे विश्वचि माझे घर' अशी माझी स्थिती झाली. एक गमतीदार आठवण. मुंबईतल्या एका न्यायालयात आमची एक केस सुरू होती. गोगी तिथं हजर होता. कार्यवाही पूर्ण झाल्यावर न्यायाधीशमहोदयांनी त्याला जवळ बोलावलं व सांगितलं, ''लोकसत्तेतलं सदर तुमच्या वडलांचं ना? छान सदर आहे ते. मी न चुकता वाचतो. त्यांना जरूर सांगा.''

सुशीलकुमारजी शिंदे यांना हे सदर आवडत असे. मी प्रीतममध्ये नसताना

ज्येष्ठ संपादक व खासदार कुमार केतकर या सदरानिमित्ताने माझं कौतुक करायला येऊन गेले. गोपीनाथजींवरचा लेख वाचल्यावर गोपीनाथजींची मुलगी ना. पंकजा मुंडे-पालव हिनं मला आवर्जून पत्र पाठवलं. प्रमोदजींवरील लेख प्रसिद्ध झाल्यावर खासदार पूनमचा फोन आला होता. एकदा मी पार्क वे वर गेलो होतो, तर राज ठाकरेंच्या पत्नी शर्मिलाजी तिथं होत्या, त्या येऊन भेटल्या व ओळख देऊन सदराबद्दल माझं अभिनंदन केलं. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल हे गोगीचे वर्गमित्र. मी भेटल्यावर ते आवर्जून ''मुंबई मेरी जान''ची चौकशी करत. 'प्रीतम' हॉटेलची राऊंड घेताना, रस्त्यात फिरताना, देशभरात विविध पार्ट्यांमध्ये, लग्नांमध्ये मुंबई मेरी जानची चर्चा लोक करत. मला गंमत वाटत असे. एका हॉटेलवाल्याला लोकसत्तेनं लेखक बनवून टाकलं.

माझ्या लेखक बनण्याला जबाबदार असणाऱ्या 'लोकसत्ते'चे संपादक श्री. गिरीशजी कुबेर यांचा मी ऋणी आहे. 'ऋतुरंग'चे श्री. अरुण शेवते यांना धन्यवाद. लोकसत्तेच्या रविवार आवृत्तीचे फीचर एडिटर श्री. रवींद्र पाथरे, तसेच श्रीमती लता दाभोळकर (यांना मी कधीच भेटलो नाही) आणि सर्व संबंधित कर्मचाऱ्यांचे मी येथे आभार मानतो.

इथं मला माझ्या पत्नीचा महिंदर कौरचा खास उल्लेख करायचा आहे. तिनं आमच्या संसाराचं प्रतल ठामपणे तोलून धरलं. मी प्रीतम रेस्टॉरंटबरोबरच अनेक सामाजिक-सांस्कृतिक घडामोडींत सामील होत असे. शाळा-कॉलेजं चालवणे, गुरुद्वाराची सेवा करणे, सिनेमा उद्योगात सामील होणे, रुग्णालये सुरू करणे व ती व्यवस्थित चालविणे - हे सारे उद्योग करत असताना तिनं दिलेली साथ अविस्मरणीय आहे. ती, माझी मुलं, माझ्या सुना, माझी नातवंडं, आमचं एकत्र कुटुंब आहे, या एकत्र कुटुंबाचा मला अभिमान वाटतो. एकाला काटा रुतला, तर दुसऱ्याच्या डोळ्यात पाणी यावं - अशी आमच्या घरातली परस्परसंबंधांची स्थिती आहे. असं एकविसाव्या शतकात फारसं आढळत नाही, पण माझ्या घरात आहे. सुखी आणि समाधानी म्हातारपणाचं गुलबकावलीचं फूल मला गवसलं आहे.

हा सारा सदरप्रवास सुंदर होता, तुमच्यासमवेत तो अधिक संस्मरणीय झाला. हे सदर पुस्तकरूपाने तुमच्यासमोर येण्यासाठी राजहंस प्रकाशनाचे सर्वेसर्वा श्री. दिलीप माजगावकर, संपादक डॉ. सदानंद बोरसे, मुखपृष्ठकार श्री. सतीश भावसार आणि टीम राजहंस यांनी मेहनत घेतली व हे पुस्तक देखण्या रूपात आणलं, यासाठी मी त्या सर्वांना धन्यवाद देतो.

तुम्हा सर्वांवर वाहे गुरुंची व गुरु नानकदेवांची कायम कृपा राहो, अशी प्रार्थना करून निरोप घेतो. पुन्हा भेटू या.

**सरदार कुलवंतसिंग कोहली**
हॉटेल प्रीतम, दादर, मुंबई

# अनुक्रम


मुंबईसंगे आम्ही 'बि'घडलो / १
हॉलिवूड लेन / ६
राजजी / ११
तुमसा नहीं देखा / १६
डांगेसाहेब / २२
स्वानंदाचा स्वर्ग / २७
चित्रपटसृष्टीचे सरदार / ३२
बी. आर्. योग / ३७
मोठ्या मनाचे यशजी / ४२
ठाकरे नावाचं गारूड / ४७
बाळासाहेब नावाचा राजयोगी / ५३
दिलीपसाब / ५९
रुपेरी माणूस / ६४
मुंबईत बैसाखी / ७०
जिंदादिल इन्सान / ७५
नरमदिल ग्यानी झैलसिंग / ८०
दिलखुलास माणूस / ८६
'भारत'कुमार / ९२
भारत भूषण / ९८
मिस्टर अँड मिसेस दत्त / १०३
लोकनेते गोपीनाथ / ११३
ऋजू वृत्तीचे अटलजी / ११९
अ परफेक्ट जंटलमन / १२५

निःस्पृह बुटासिंग / १३१
स्वयंप्रकाशी व्यक्तिमत्त्व / १३७
अप्सरा / १४२
मुंबई : २६ जुलै २००५ / १४८
त्या दोघी / १५३
स्मृती ठेवुनी जाती / १५८
खुदा का पाक बंदा / १६४
चंदन-मंजूची प्रेमकहाणी / १७०
'पाकीजा'चे स्वप्न / १७६
निखळ मैत्र / १८२
स्वप्नपक्षी मधुबाला / १८८
हृदयरोगी हृदयसम्राज्ञी / १९४
अर्ध्यावरती डाव मोडला / १९९
आदरातिथ्याचे प्रणेते / २०६
माझा लेखकमित्र / २१२
राजस फकिरी / २१८
'पाकीजा'चे दिवस / २२५
'मुघल-ए-आझम'चे ध्यासपर्व / २३२
सिर्फ़ नाम ही काफ़ी है / २३९
कष्टाळू जितेंद्र / २४५
मोठी माणसं / २५१
दिलखुलास संगीतकार / २५७
मुलायम आवाजाचा धनी / २६४
हरफनमौला / २७१
पंजाब-दा-पुत्तर / २७८
प्रीतम : एक ऋणानुबंध / २८४
कभी अलविदा ना कहना / २९१